
Impact Factor- 6.75
ISSUE No - CCCVII (308)
July - 2021
ISSN- 2278-9308

# INDIAN FARMERS & AGRICULTURE : ISSUES & CHALLENGES



Chief Editor
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati

Editor
**Dr. Shrikant M. B. Bhowate**
Head, Dept. of Pol. Sci.
S.N.T. College of Arts & Commerce, Ramtek, Dist- Nagpur
Secretory -
Bhumkal Organization, Nagpur (M.S.)

## B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed
Multidisciplinary International Research Journal
Sciences, Social Sciences, Commerce, Education, Language & Law

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

Scanned with OKEN Scanner

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 307 (CCCVII)
ISSN : 2278-9308 July, 2021


| | | |
|---|---|---|
| 41 | भारत में किसान और किसान आंदोलन– ऐतिहासिक और सामयिक संदर्भ **डॉ० यशवन्त यादव विनोद कुमार पाण्डेय** | 246 |
| 42 | भारतीय अर्थव्यवस्था में कृशि क्षेत्र की भूमिका **विरेन्द्र कुमार सैनी वरूण कुमार** | 254 |
| 43 | जषुपर जिले में जल की सुविधा एवं शिशु मर्त्यता दर :एक भौगोलिक अध्ययन **डॉ. अनोज एक्का** | 264 |
| 44 | रेमण्ड सीमेंट गोपालनगर संयंत्र के श्रमिकों का जीवन स्तर **कुमुदिनी किस्पोट्टा डॉ. अनोज एक्का अल्मा ग्रेस केरकेट्टा** | 268 |
| 45 | रचनाकारों की राजनीतिक चेतना : एक अध्ययन ''महाभोज के विषेश संदर्भ में '' **अल्मा ग्रेस केरकेट्टा डॉ. अनोज एक्का कुमुदिनी किस्पोट्टा** | 278 |
| 46 | भारतीय किसान--कृशि की बढ़ती जनसंख्या एक मुद्दा और अनेक चुनौतियां भारतीय संस्कृति व समाजनीति **डॉ. रोहताष जमदग्नि** | 288 |
| 47 | शेतीविषयक पारीत विधेयक व शेतकरी आंदोलन **डॉ. संदिप बाळकृष्ण सातव** | 293 |
| 48 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार व कार्य **सुनील कठाने** | 299 |
| 49 | शेतकऱ्यांची समस्या आणि उपाय **डॉ. रणधीर साठे** | 305 |
| 50 | भारतीय कृषी कायदे २०२०: शेतकरी आंदोलने आणि वास्तविकता. **अमरिश ठाकरे** | 308 |
| 51 | चंद्रपूर जिल्ह्यातील जबराण जोत शेतकऱ्यांच्या कृषीचे प्रादेशिकीकरण **डॉ. राकेश झि. सरादे** | 315 |
| 52 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय **डॉ. दिलीप पांडुरंग महाजन** | 323 |
| 53 | शेतकरी आत्महत्या : कारणे व उपाययोजना **विकास नामदेव लोडे** | 335 |
| 54 | सरकारी धोरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या **अविनाश ब. अवचट** | 341 |
| 55 | प्रत्यक्ष विदेशी गुंतवणीकीचा (FDI) भारतीय शेतीक्षेत्रावर झालेला परिणामांचा विश्लेषणात्म अध्ययन **भेदराज भानुदास ढवळे** | 346 |
| 56 | सेंद्रिय शेती : कृषी शाश्वत विकासाचा मार्ग **अंजली रामचंद्र कदम/नारायणे** | 353 |


Scanned with OKEN Scanner

मृत्युदराची माहिती मिळते. आत्महत्यामृत्युदर म्हणजे प्रति १ लाख व्यक्तींमागे आत्महत्यांमुळे झालेल्या मृत्यूंची संख्या होय. या माहितीनुसार १९९६ ते २००५ या काळात पुरुष शेतकऱ्यांच्या बाबत आत्महत्या मृत्युदराचा वार्षीक वृध्दीदर ४.८ टक्के होता. भारतातील पुरुष शेतकऱ्यांच्या बाबत आत्महत्यादर १९९६ मध्ये १२.३, २००४ मध्ये १९.२ व २००५ मध्ये १८.२ होता. भारतातील शेतकऱ्यांच्या एकूण आत्महत्यांपैकी पुरुष शेतकऱ्यांचे प्रमाण ८९ टक्के आहे. तर एकूण शेतकरी आत्महत्यांपैकी ५४ टक्के आत्महत्या आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्रात झाल्यात. पुरुष शेतकऱ्यांबाबत उच्च आत्महत्यादर असलेल्या राज्यात केरळ—१९५, महाराष्ट्र—५१, छत्तीसगड — ४५, कर्नाटक ४१, आंध्रप्रदेश ३३, तामिळनाडू—३२ व पश्चिम बंगाल २० यांचा समोवश आहे.

| वर्ष | कृषी विकास दरातील घट |
|---|---|
| १९९१—९२ | — १३ टक्के |
| २०१३—१४ | — १२.३ टक्के |
| २०१४—१५ | — उणे १०.७ टक्के |
| २०१५—१६ | — उणे ३.२ टक्के |
| २०१६—१७ | — २२.५ टक्के |
| २०१७—१८ | — उणे ८.३ टक्के |

| वर्ष | भारताच्या जीडीपीत शेतीचा हिस्सा |
|---|---|
| १९५०—५१ | ५५.४ टक्के |
| १९६०—६१ | ५२.५ टक्के |
| १९७०—७१ | ४४.५ टक्के |
| १९८०—८१ | ३८.१ टक्के |
| १९९०—९१ | ३०.९ टक्के |
| २०००—०१ | २४.२ टक्के |
| २००९—१० | १४.२ टक्क |

**विषयाचा परिचय व महत्व :—**

भारतात शेतीप्रधान व श्रमाधारीत अर्थव्यवस्था लागू असून भारताचा आर्थीक विकास शेती क्षेत्राच्या विकासावरच अवलंबून आहे. भारतातील सव्वा अब्जापेक्षा अधिक लोकसंख्येला अन्नधान्य पुरविणारा अन्नदाता, कृषीदेव मात्र जुगारी मान्सुनचा बळी ठरत असल्याचे दिसुन येते. भारत खेडयांचा देश असून खेडयात शेती हा प्रमुख उपजीविकेचे साधन व जीवन पध्दती आहे. अलीकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र आहे. ही एक राष्ट्रासमोरील गंभीर समस्या बनत चालल्याचे दिसून येते. जागतिकीकरणानंतरच्या काळात शेतीचा विकास दर ३.२ टक्के वरुन १.३ टक्के पटीत घटला आहे. शेतीत कुंठीतावस्था निर्माण झाली आहे. हरितक्रांती घडूनही अपेक्षीत लाभ समाजातील सर्व घटकांना मिळाले नाहीत. भारतीय शेतकरी सुखी नाही. म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहे. ग्रामीण कर्जबाजारीपणा हे त्यातील प्रमुख कारण म्हणून ह्या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देण्याच्या उद्देशाने संशोधकाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे व उपाय या विषयावर थोडक्यात प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्याचा कारणे व उपाय ह्या गंभीर समस्येची सुरुवात सर्वप्रथम केरळ मध्ये झाली. त्यानंतर हे प्रमाण हळूहळू सर्व देशात वाढू लागले. १९९६ ते २००५ ह्या काळातील पुरुष शेतकऱ्यांच्या बाबतीतील आत्महत्या मृत्युदराचा वार्षीक वृध्दीदर ४.८ टक्के होता. १९९६ मध्ये १२.३ टक्के तर २००४ मध्ये हा दर १९.२ टक्के तर २००५ मध्ये आत्महत्यादर १८.२ टक्के होता. ५४ टक्के आत्महत्या आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्रात झाल्या आहेत. देशात दररोज ४० ते ५० शेतकरी आत्महत्या करतात. आजपर्यंत देशात जवळपास ४ लाखांच्यावर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. तर महाराष्टातील ७० हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. मात्र हिमाचल प्रदेश, जम्मु—कश्मीर, झारखंड, मिझोराम, नागालॅंड, उत्तराखंड या राज्यांत एकाही शेतकऱ्याची आत्महत्या झालेली नाही. म्हणून महाराष्ट्राच्या दृष्टीने ह्या विषयाच्या अभ्यासाचे महत्व अधिक आहे.

**अभ्यासाची गृहीतके :—**

1. भारतातील वाढत्या लोकसंख्येमुळे अपखंडन व आंतर विभाजनाने शेतीचे तुकडीकरण होत आहे.
2. शेतकरी अनियमित मान्सुनमुळे सावकारी व इतर कर्जाच्या सापळयात अडकत चालला आहे.
3. भारतीय शेती अधिकांश प्रमाणात कोरडवाहू स्वरुपाची असुन त्यातुन मिळणारे उत्पादन व उत्पन्न अनिश्चित स्वरुपाचे आहे.
4. गेल्या काही वर्षात शेतकरी आत्महत्येत वेगाने वाढ होत आहे.
5. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती व आत्महत्या यांचा जवळचा संबंध आहे.
6. दुष्काळ व शेतकरी आत्महत्या यांचा जवळचा संबंध आहे.
7. शेतकरी आत्महत्येचा प्रश्न सर्वत्र सारखा नाही.

**शोधनिबंधाच्या अभ्यासाची उद्‌दीष्टये :–**

1. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होण्याच्या कारणांचा अभ्यास करणे /शोध घेणे.
2. शेतकरी आत्महत्या आकडेवारीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे / शोध घेणे.
4. शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होण्यासाठीच्या उपाययोजना, साधनांचा अभ्यास करणे.

**अभ्यासाची संशोधन पध्दती :–**

ह्या संशोधनपर शोध निबंधासाठी मिळविलेली माहिती पुर्णपणे दुय्यम साधन सामग्रीवर आधारलेली असुन त्यासाठी विविध संदर्भग्रंथ, पुस्तके, विविध अहवाल, वार्षीकांक, मासिके, साप्ताहिके व देनंदिन वृत्तपत्रांमधुन सदरची सांख्यीकीय व विश्लेषणात्मक माहिती तसेच इतर आवश्यक आकडेवारी करुन, संदर्भ घेऊन सदरचा संशोधनपर शोध निबंध तयार करण्यात आला आहे.

**भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या (२००१)**

| राज्य | शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रकरणांची संख्या | एकुण आत्महत्यांच्या संख्येत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण |
|---|---|---|
| महाराष्ट्र | ३५३६ | २४.२ |
| कर्नाटक | २५०५ | २१.१ |
| आंध्रप्रदेश | १५०९ | १४.३ |
| छत्तीसगड | १४५२ | ३६.१ |
| मध्यप्रदेश | १३७२ | २० |
| पश्चिम बंगाल | १२४६ | ९.१ |
| केरळ | १०३५ | १०.८ |
| तामीळनाडु | ९८५ | ८.७ |
| उत्तरप्रदेश | ७०९ | १८.५ |
| गुजरात | ५९४ | १२.४ |
| राजस्थान | ५०५ | १५.८ |
| ओरिसा | १४५ | ७.२ |
| पॉडीचेरी | ९१ | १७.२ |
| बिहार | ८८ | १०.३ |
| पंजाब | ४५ | ६.९ |
| त्रिपुरा | ४१ | ४.८ |

| | | |
|---|---|---|
| हिमाचलप्रदेश | २२ | ७.२ |
| गोवा | १८ | ७ |
| जम्मु—कश्मिर | १५ | ९.८ |
| भारताचे एकुण प्रमाण | १६४१५ | १५.२ |

संदर्भ : के.नागराज (२००८) भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या (अहवाल)

**भारतातील विविध राज्यांतील शेतकऱ्यांच्या आत्महत्या :—**

| राज्य / वर्ष | २०१० | २०१३ | २०१४ | २०१५ |
|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १५९६४ | १६६२२ | ४००४ | ४२९१ |
| छत्तीसगड | ११२६ | | ७५५ | ९५४ |
| कर्नाटक | २५८५ | ११२६६ | ७६८ | १५६९ |
| तामीळनाडू | | १६६२२ | - | |
| आंध्रप्रदेश | २५२५ | १४६०७ | ६३२ | ९१६ |
| मध्यप्रदेश | १२३७ | १०९० | ११९८ | १२९० |
| पश्चिम बंगाल | ९९३ | १३०५५ | | |
| केरळ | ८९५ | | | |
| तेलंगणा | | | १३४७ | १४०० |

**भारतातील विविध राज्यांची कर्जाची आकडेवारी**

| राज्य | शेतकरी कुटूंबावरील सरासरी कर्ज (रु.) | कर्ज असणाऱ्या शेतकरी कुटूंबाचे प्रमाण (:) | २०१५—१६ सालातील अन्नधान्य उत्पादन (टनात) | २०१३—१५ या काळात झालेल्या शेतकरी आत्महत्त्या |
|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | ५४७०० | ५७.३ | ८०६७००० | ११४४१ |
| कर्नाटक | ९७२०० | ७७.३ | ९९६९००० | ३७४० |
| तामीळनाडू | ११५९०० | ८२.५ | ११९४१००० | १६०६ |
| आंध्रप्रदेश | १२३४०० | ९२.९ | १०५७२००० | ३५६२ |
| तेलंगणा | ९३५०० | ८९.१ | ५०२५००० | २७४७ (२०१४ व २०१५) |
| ओरिसा | २८२०० | ५७.५ | ६५९०००० | ३०२ |
| पश्चिम बंगाल | १७८०० | ५१.५ | १७७७६००० | २३० |
| छत्तीसगड | १०२०० | ३७.२ | ६९५९००० | १७०९ |
| मध्यप्रदेश | ३२१०० | ४५.७ | ३०२१३००० | ३५७८ |
| हरियाणा | ७९००० | ४२.३ | १६३८२००० | ६८५ |
| पंजाब | ११९५०० | ५३.२ | २८४०८००० | २७१ |
| राजस्थान | ७०५०० | ६१.८ | १८१०१००० | ७४१ |

१९९७ ते २००२ या काळात कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, केरळ या राज्यातील ३९२६२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यातील २८९११ आत्महत्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या होत्या. २००६ ते २०१३ काळात महाराष्ट्रात १६६२२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. १९९५ ते २००३ या काळात देशात एकुण १३८३२२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या तर १९९६ ते २००५ काळात भारतात १९९२०४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.



Scanned with OKEN Scanner

**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : सद्यस्थिती**

| वर्ष | महाराष्ट्र राज्य | मराठवाडा क्षेत्र | विदर्भ क्षेत्र | प.विदर्भ विभाग | बुलडाणा जिल्हा | चिखली तालुका |
|---|---|---|---|---|---|---|
| १९९५ | १०८३ | | | | | |
| १९९६ | १९८१ | | | | | |
| १९९७ | १९१७ | | | | | |
| १९९८ | २४०९ | | | | | |
| १९९९ | २४२३ | | | | | |
| २००० | ३०२२ | | | | | |
| २००१ | ३५३६ | | ५२ | ४९ | | ३ |
| २००२ | ३६९५ | | १०४ | ८० | | २ |
| २००३ | ३८३६ | | १४८ | १३४ | १४ | ५ |
| २००४ | ४१४७ | | ४४८ | ४१९ | ८५ | १४ |
| २००५ | ३९२६ | | ४४५ | ४१९ | ८१ | २४ |
| २००६ | ४४५३ | | १४४९ | १२९५ | ३०६ | ५७ |
| २००७ | ४२३८ | | १२४७ | १११९ | १९३ | ३८ |
| २००८ | ३८०२ | | १३८७ | १०६१ | १९५ | ३६ |
| २००९ | २८७२ | | १००५ | ९०५ | १०३ | ७ |
| २०१० | ३१४१ | ११२ | ११७७ | १०५१ | १३७ | ११ |
| २०११ | ३३३७ | ७३ | ९९९ | ८८६ | १२६ | १५ |
| २०१२ | ३७८६ | ११२ | ९५१ | ८४२ | १५३ | २ |
| २०१३ | ३१४६ | ११९ | ८८२ | ७०५ | १११ | ७ |
| २०१४ | ४००४ | ४३८ | ११२८ | ९६३ | ११० | १३ |
| २०१५ | ४२९१ | ८३१ | १५७० | ११८४ | ११६ | २२ |
| २०१६ | ३०६३ | ७५९ | १४७७ | ११०३ | २१७ | |
| २०१७ | २९७१ | ७७९ | १३४४ | १०६६ | | |
| २०१८ | २७६१ | ४८९ | १२९७ | १०४९ | | |
| २०१९ | २५७२ | | १२२७ | १०५८ | | |
| २०२० | २९१२ | | १३५७ | १२०६ | २६० | |
| २०२१ | | | | | | |

**शेतकरी आत्महत्येची कारणे :—**

मान्सुन/निसर्गावर अवलंबीत असणारे ७० टक्के शेतकरी आहेत.

पिकांबाबत विविधता — अन्नधान्यात ३/४ शेतीचा हिस्सा आहे.

अल्पभूधारक शेतकऱ्यांचे मोठे प्रमाण/विषमतेचे मोठे प्रमाण

१ हे. पेक्षा कमी ५१ टक्के शेतकरी १० हे. पेक्षा कमी जमीन ९६ टक्के शेतकरी आहेत.

१ ते ४ हे. ३४ टक्के शेतकरी १०हे. पेक्षा जास्त जमीन ०.४ टक्के शेतकरी आहेत.

एकुण धारण क्षेत्रापैकी ८५ टक्के धारण क्षेत्र ४ हे. पैक्षा कमी आहे.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 308 (CCCVIII )
ISSN : 2278-9308
July, 2021

लहान आकाराची/अकार्यक्षम धारण क्षेत्र–७५ टक्के आत्महत्या, २ ते १२.५ एकर जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांच्या आहेत, पाणिपुरवठ्याच्या पध्दती कमी, पाणीपुरवठ्याचे स्रोत कमी, भुधारणेचा आकार लहान

शेतकऱ्यांमधील वाढता कर्जबाजारीपणा, कर्जाचा अनुत्पादक वापर, सावकारांकडून पिळवणूक आणि सावकारीचे वाढते प्रमाण, शेतमालाच्या किंमतीतील चढउतार/योग्य भाव न मिळणे, बियाणे, खते, किटक नाशकांच्या वाढत्या किंमती, चूकीचे सरकारचे धोरण – २०१३ मध्ये सोयाबीनचे भाव सर्वोच्च शिखरावर गेले असतांना शासनाने सोयातेल आयात केल्याने भावात घट झाली. कांदा आयात, साखर आयात, तेल आयात २०१६, २०१७ मध्ये ४६२७१० टन तुर आयात यामूळे भाव घट झाली.

भारतातील ६० टक्के तर महाराष्ट्रातील ८२ टक्के क्षेत्र कोरडवाहु आहे. शासनाने ग्रामीण विकास खर्चात घट केली. कृषी व्यवस्थेचे बदलते स्वरुप, विजेचा अपूरा पुरवठा, पुरक उद्योगांची कमतरता, जमीनीचा अतिरीक्त वापर, वित पुरवठयाच्या उपलब्धतेतील अडचण, परंपरागत उत्पादन पध्दतीचा वापर, दुष्काळ, महापूर, अवेळी येणारा पाउस, वादळ इ. नैसर्गिक आपत्ती, निकृष्ठ बियाणे, शिक्षणाचा अभाव, जमिनी विषयक वाद, कुटूंबातील भांडणे, कुटूंबातील विवाह, शेतकऱ्यांचे आजारपण, शेतीतील गुंतवणूक तोटयाची ठरणे, सामाजिक सुरक्षिततेच्या उपाययोजनांचा अभाव, पिकविम्यांचा अभाव, उत्पादनांच्या पर्यायी साधनांचा अभाव, नैसर्गिक आपत्तीत सरकारकडुन योग्यवेळी व पुरेशी मदत न मिळणे, शेतकऱ्यांची फसवणूक, दिर्घकालीन विज पुरवठा नाही, अल्पभूधारकांना कर्ज मिळण्यात अडचण, चंगळ वादामुळे गरजांत वाढझाली, उत्पादन खर्चात वाढझाली, दारीद्रयाचे दुष्ट चक्र वाढले, आत्मविश्वासाचा अभाव निर्माण झाला, जागतीक व्यापार धोरण कारणीभूत ठरले, शेती अनुदाने कमी केलीत, २००३ मध्ये जपान ने एकुण उत्पादनाच्या ७२.५ टक्के अनुदाने दिली, अमेरिकेत २९ टक्के अनुदाने दिली, चिनमध्ये ३४ टक्के अनुदाने दिली, तर भारतात मात्र ३ टक्के अनुदाने दिली गेली, वाढदिवस, विवाह, मुंज, बारसे इत्यादी सामाजिक प्रतीष्ठेत अवाजवी खर्च होतो, अशिक्षित, दैववादी, निरक्षरता, अज्ञानी, अंधश्रध्दा, कोरडवाहू शेती, दारिद्र्याचे दुष्टचक्र, बचत कमी, गुंतवणूक कमी, कृषी भांडवलाचा अभाव, ६५ टक्के जनता शेतीवर अवलंबून, राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा १७.२ टक्के मात्र असून त्यासाठी तरतुद २.५ टक्के तर सिंचनासाठी ०.३५ टक्के तरतुद दिली जाते. शेतकरी आत्महत्येच्या प्रश्नाला उग्र स्वरुप धारण करण्याचे कारण शेतमालाला दिली जाणारी नगण्य किंमत वाढही आहे. २०२१–२२ मध्ये किमान हमीभावात क्विंटल मागे मात्र ७२ ते ४२५ रुपयांची वाढ केली आहे. एकीकडे नोकरदारांना दिल्या जाणाऱ्या महागाई भत्यांचा विचार करता ही वाढ नगण्य आहे. खते, किड रोग निवारक औषधे, विजदर डीझेल पेट्रोलच्या किमती कृषी कर्जावरील व्याजदर जोखीम व इतर आदानांच्या व मजुरीच्या दरातील वाढीमूळे कृषी उत्पादन खर्चात २० ते ३० टक्के वाढ तुटपूंजी झाली आहे. त्यांच्या तुलनेत हमीभाव १ ते ६.५९ टक्के इतकेच वाढले आहेत.

**केंद्राने जाहीर केलेल्या आधारभूत किमती (प्रति क्विंटल)**

| अ. क्र. | पिक | २०२०–२१ चे दर (रुत) | २०२१–२२ चे दर (रुत) | शेकडा वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | धान (अ) | १८८८ | १९६० | ३.८१ |
| २ | धान (ब) | १८६८ | १९४० | ३.८५ |
| ३ | ज्वारी | २६२० | २७३८ | ४.५० |
| ४ | बाजरी | २१५० | २२५० | ४.६५ |



Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | राळी | ३२९५ | ३३३७ | १.२७ |
| ६ | मका | १८५० | १८७० | १.०८ |
| ७ | तुरडाळ | ६००० | ६३०० | ५ |
| ८ | उडीद | ६००० | ६३०० | ५ |
| ९ | मुग | ७१९६ | ७२७५ | १.१० |
| १० | तीळ | ६८५५ | ७३०७ | ६.५९ |
| ११ | शेंगदाणा | ५२७५ | ५५५० | ५.२१ |
| १२ | सुर्यफुल | ५८८५ | ६०१५ | २.२१ |

संदर्भ :– अर्थदृष्टी – डॉ.संजय तुपे – दै.पुण्यनगरी

**निवडक पिकांबाबत आंतरराष्ट्रीय तुलना (२००४–०५)**
**शेतजमीनीची कमी उत्पादकता (दर हेक्टरी उत्पादन मेट्रिक टन मध्ये)**

| देश | तेलबीया | गहु | तांदुळ | उस | शेंगदाणे | मका | कापूस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इंग्लंड | | ८.०४३ | | | | | |
| भारत | ०.८६ | २.७८५ | २.९६४ | ६८.०४९ | १.०८६ | १.९८ | ४.६४ |
| इजिप्त | | | ९.८३५ | | | | |
| इजिप्त | | | | ११९.८९३ | | | |
| अमेरिका | | | | | ३.३९३ | ९.९६ | |
| चिन | | | | | | | ११.१० |
| जर्मनी | ४.०७ | | | | | | |

वनतबम म्बवदवउपब मतअमल २००६.०७

**भारत सरकारचे पॅकेज :–**

१९९० मध्ये १०००० रुपयांची सरकट कर्जमाफी साडेचार कोटी शेतकऱ्यांना केंद्राने दिली. २००८–०९ मध्ये ६०००० को.रु. (१ ते २ हेक्टर दरम्यान जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफ तर २ हे. पेक्षा अधिक जर्मान असणाऱ्या कर्जदार शेतकऱ्यांना कर्ज रकमेत २५ टक्के सुट)

२००७–०८ च्या अंदाजपत्रकात शेतकऱ्यांसाठी एनडीए सरकारने ७१००० को.रु. चे कर्जमाफी पॅकेज जाहीर केले.

**शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र सरकारने दिलेली पॅकेजेस :–**

२००२ १०७५ को.रु.
२००३ ७६३ को.रु. (विदर्भासाठी)
२००५ १०७५ को.रु. (आत्महत्या रोखण्यासाठी)
२००६ ३७५० को.रु.
२००६ ३५०० को.रु. (मराठवाड्यासाठी)
२००८ ९८६८ को.रु. (कर्जमाफीसाठी)
२००८ ६००० को.रु. (लाभ न झालेल्या शेतकऱ्यांसाठी)
२००९ ६५०० को.रु. (खान्देशासाठी)



Scanned with OKEN Scanner

२००९ ५२३२ को.रु. (कोकण विकासासाठी)
२००९ ५००० को.रु. (मराठवाड्यासाठी)
२०१० १००० को.रु. (फयान वादळग्रस्तांसाठी)
२०११ २००० को.रु. (कापूस, सोयाबीन धानसाठी)
२०१२ १२०० को.रु. (अवकाळी पाऊस)
२०१३ ४५०० को.रु. (दुष्काळ व प्राण्यांसाठी)
२०१४ ७००० को.रु. गेल्या १० वर्षात ६० हजार को.रु. ची पॅकेजेस देण्यात आलीत.
२०१७ २२००० को.रु.

२४ जुन २०१७ ३४००० को.रु. कर्जमाफीने ४० लाख शेतकऱ्यांचा उतारा कोरा होवून १.५० लाख रु.पर्यंतचे कर्ज सरसकट माफ केले. याचा फायदा ८९ लाख शेतकऱ्यांना झाला.

**महाराष्ट्रातील कर्जमाफीचे जिल्हानिहाय लाभार्थी शेतकरी**

| | | | |
|---|---|---|---|
| विदर्भ ११४६७६८ | | | |
| बुलडाणा | २४९८१८ | चंद्रपूर | ९९७४२ |
| गडचिरोली | २९१२८ | गोंदिया | ६८२९० |
| नागपूर | ८४६४५ | यवतमाळ | २४२४७१ |
| वाशीम | ४५४१७ | अमरावती | १७२७६० |
| अकोला | १११६२५ | भंडारा | ४२८७२ |
| मराठवाडा १०८३९३२ | | | |
| औरंगाबाद | १४८३२२ | नांदेड | १५६८४९ |
| लातुर | ८०४७३ | उस्मानाबाद | ७४४२० |
| बीड | २०८४८० | हिंगोली | ५५१६५ |
| जालना | १९६४६३ | परभणी | १६३७६० |
| उत्तर महाराष्ट्र खांदेश ४३९६१९ | | | |
| नाशीक | १३६५६९ | नंदुरबार | ३३५५६ |
| जळगांव | १९४३२० | धुळे | ७५१७४ |
| पश्चिम महाराष्ट्र ७३९१४८ | | | |
| अहमदनगर | २००८६९ | सोलापूर | १०८५३३ |
| पुणे | १८२२०९ | कोल्हापूर | ८०९४४ |
| सांगली | ८९५७५ | सातारा | ७६०१८ |
| कोकण १०१७५३ | | | |
| रत्नागिरी | ४१२६१ | ठाणे | २३५०५ |
| सिंधुदुर्ग | २४४४७ | मुंबई | ६९४ |
| पालघर | ९१८ | मुंबई उपनगर | ११९ |
| रायगड | १०८०९ | | |

**उपाय :—**

शासकीय योजनांची माहिती गरजुंपर्यंत पोहोचवणे. शेतकऱ्यांची मानसिकता बदलणे, मानसिक संतुलन राखणे, परिस्थितीतुन वाट काढणे, संस्थात्मक स्वरुपाच्या वित्तपुरवठ्यात वाढ करणे, द्रारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणे, त्यात एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रम, दुष्काळपिडीत क्षेत्र कार्यक्रम, किमान गरजा कार्यक्रम, खेडे विकास कार्यक्रम, अंत्योदय अन्न योजना, पंतप्रधान ग्रामोदय योजना, पिकविमा कर्जमाफी योजनांच्या अंमलबजावणीत



Scanned with OKEN Scanner

पारदर्शकता हवी. भ्रष्टाचार दुर करणे, कृषी कर्ज पुरवठ्याचा विस्तार करुन पिककर्ज व्याजदर ४ टक्क्यांवर आणणे. रोजगार निर्मिती कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करुन राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम, स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना, जवाहर रोजगार योजना, रोजगार हमी योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम, शेतमालास उत्पादन खर्चावर आधारीत भाव देणे, कर्जमाफी, कमी व्याजदरावर सहज व पुरेशे कर्ज देणे. योग्य हमी भावात उत्पादन खर्च वजा जाता ५० टक्के अधिक असावा. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थैर्य आणावे. सर्वच पिकांसाठी पिकविमा योजनेत प्रभावी अंमलबजावणी करावी. (अतिवृष्टी, अनावृष्टी, हवामानातील बदल, पिकांवरील रोग, निकृष्ट बियाणांमुळे पिक न येणे या सर्व बाबींसाठी पिकविमा विचारात घ्यावा. पिकांवरील रोग, किड्यांचा बंदोबस्त याबाबत मार्गदर्शन करावे. पिकविमा भरपाई त्वरीत द्यावी. मार्फत किंमतीत बी—बीयाणे तसेच किटकनाशके उपलब्ध करुन द्यावे. जलसिंचन सुविधेत वाढ करुन सिंचनाची बारमाही व्यवस्था व्हावी. कृषी संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. शेतीचे आधुनिकीकरण करुन कृषिपूरक व्यवसायांचा विकास करावा. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मेंढीपालन, पशुपालन, मत्स्यपालन, शेळीपालन सरकारने विनापरवाना सावकारांवर कडक कार्यवाही करावी. शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करावा. स्वावलंबीवृत्ती वाढवणे गरजेचे आहे. लोकसंख्या नियंत्रण करुन दारिद्र्य, बेकारी, धारण क्षेत्राचा घटता आकार विचारात घ्यावा. शिक्षणाचा प्रचार व प्रसार करतांना फी भार कमी करावा. कृषी आदानांच्या किमतीत घट करावी. त्यासोबत रोख अनुदान द्यावे. सिंचन व्यवस्था वाढवावी. बोगस बियाणांवर कडक नियंत्रण आणुन उत्पादक व विक्रेत्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. सेंद्रीय शेतीचा विकास करावा. जमीनीची पोत, हवामानाची अनुकूलता, आदानांची उपलब्धता यावरुन उत्पादकता ठरवावी. शेती क्षेत्रातील गुंतवणूक वाढवावी. शेतकऱ्यांच्या आरोग्य विम्याची तरतुद करावी. कृषीमुल्य आयोगाच्या कृषीची परिपूर्ण माहिती असावी. मृदासंवर्धन सुपीकता तपासणी याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. शेती उत्पादकता, नफा व शाश्वतता वाढीचे प्रयत्न व्हावेत. ग्रामीण शेती कर्ज पुरवठ्यात वाढ करावी. अस्थिर आंतर राष्ट्रीय बाजारपेठेपासुन शेतकऱ्यांचे संरक्षण करावे. कोरडवाहू, किनारपट्टीलगत व डोंगराळ जमीन शेतीयोग्य बनवणे, शेतमालाचा दर्जा व किंमत यांची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी सांगड घालावी.

**सारांश :—**

स्वातंत्र्योत्तर हिरक महोत्सवी काळात शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या २०५ पटीने वाढली.अन्नधान्याचे उत्पादन ५ पटीने वाढले. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनातील शेतीचा वाटा ५७ टक्के वरुन १४ टक्के इतका कमी झाला.

दुष्काळ व शेतकरी आत्महत्त्येचा जवळचा संबंध आहे. तसेच कोरडवाहु शेती व आत्महत्त्यांचा ही जवळचा संबंध आहे. पुरुषांचे आत्महत्त्येचे प्रमाण जास्त असुन महिला शेतकऱ्यांचे आत्महत्त्येचे प्रमाण कमी आहे. हवामान बदल, नैसर्गिक आपत्ती, सरकारची चुकीची धोरणे, कमी उत्पादन, अस्थिर बाजारपेठ, कमी उत्पादकता, तोट्याची कृषी पध्दत, अयोग्य जमीन धारण क्षमता, बिगरकृषी क्षेत्रातील रोजगारीचा अभाव, देशांतर्गत कृषीची उत्पादकता ही असमान आहे. पंजाबचे प्रति हे. तांदुळ तो सध्या २ टक्के हून कमी आहे. जीडीपीतील ४० टक्के हिस्सा सध्या १३ टक्के आहे. म्हणून कृषी विकासासाठी योग्य व परिणामकारक सरकारी धोरणे अत्यावश्यक आहेत. म्हणून कृषी विकासासाठी योग्य व परिणामकारक सरकारी धोरणे अत्यावश्यक आहेत. सुधारीत बियाणे, संशोधक, सिंचनसुविधा, योग्य वित्तपुरवठा या सरकारी उपाययोजनांच्या बळावर हरीत क्रांती झाली. जागतीकीकरणानंतर सरकारचा अर्थव्यवस्थेमधील हस्तक्षेप कमी झाला. कृषी संकटाचे हे मुख्य कारण आहे. १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला ६७



Scanned with OKEN Scanner

टक्के असणार कृषीदर दशकाच्या शेवटी २९ हून खाली आला यामुळे कृषी क्षेत्राला पुन्हा सुगिचे दिवस आणण्यासाठी सरकारच्या सक्रीय हस्तक्षेपाला पर्याय नाही. शेतीपुरक व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांचे आत्महत्त्येचे प्रमाण कमी आहे. शासकीय मदती बरोबरच शासकीय आधाराने शेतकरी आत्महत्त्येचा प्रश्न सुचण्यास अधिक मदत होणार आहे.

कृषी उत्पादनांना मानाची आधार किंमत देवून कृषी अनुदानात वाढ करुन, सिंचन क्षेत्रात वाढझाल्यास व मुबलक पाणी, वीज कर्ज सुविधा उपलब्ध करुन दिल्यास भारत ह्या गंभीर समस्येतुन बाहेर येवू शकेल त्यासाठी कर्ज व्याजदराने शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करुन देणे ही काळाची गरज आहे त्यासाठी राजकर्त्यांना व शासनाला सुबुध्दी योवे हीच सदिच्छा.

**सारांश**

भारतीय शेती अर्थव्यवस्थेचा पाया आहे. सुर्या विना सृष्टी नाही, तर शेतकऱ्यांविना देश नाही. शेतकरी अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारत हा शेतीप्रधान देश असून शेती हा भारतीयांचा परंपरागत व्यवसाय आहे. भारतातील ६५ टक्के पेक्षा अधिक लोक प्रत्यक्ष अप्रत्यक्ष शेतीवर अवलंबून आहे. शेती लोकांची जीवन जगण्याची पध्दती आहे. २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर भारत जागतिक महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहतानाच भौगोलिक क्षेत्राच्या एकुण ४३ टक्के शेती हिस्सा, १३.९ टक्के स्थुल देशांतर्गत उत्पन्न कृषी उत्पादनातून मिळेल. शेती व शेती व्यवसाय मात्र आर्थिक अरिष्टातुन जात आहे. अलिकडील १९९५ ते २००७ या काळात भारतातील ४ लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात त्यापैकी ९० हजार म्हणजे ६० टक्के आत्महत्या महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश, छत्तीसगडसह यातील आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्युरो हा आत्महत्यासंबंधी आकडेवारीचा प्रमुख स्त्रोत त्यामार्फत आत्महत्या मृत्युदराची माहिती मिळते. आत्महत्यामृत्युदर म्हणजे प्रति १ लाख व्यक्तींमागे आत्महत्यांमुळे झालेल्या मृत्यूंची संख्या होय. या माहितीनुसार १९९६ ते २००५ या काळात पुरुष शेतकऱ्यांच्या बाबत आत्महत्या मृत्युदराचा वार्षीक वृध्दीदर ४.८ टक्के होता. भारतातील पुरुष शेतकऱ्यांच्या बाबत आत्महत्यादर १९९६ मध्ये १२.३, २००४ मध्ये १९.२ व २००५ मध्ये १८.२ होता. भारतातील शेतकऱ्यांच्या एकूण आत्महत्यांपैकी पुरुष शेतकऱ्यांचे प्रमाण ८९ टक्के आहे. तर एकूण शेतकरी आत्महत्यांपैकी ५४ टक्के आत्महत्या आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्रात झाल्यात. पुरुष शेतकऱ्यांबाबत उच्च आत्महत्यादर असलेल्या राज्यात केरळ–१९५, महाराष्ट्र–५१, छत्तीसगड – ४५, कर्नाटक ४१, आंध्रप्रदेश ३३, तामिळनाडू–३२ व पश्चिम बंगाल २० यांचा समोवश आहे.

**अभ्यासाची गृहीतके :–**

8. भारतातील वाढत्या लोकसंख्येमुळे अपखंडन व आंतर विभाजनाने शेतीचे तुकडीकरण होत आहे.
9. शेतकरी अनियमित मान्सुनमुळे सावकारी व इतर कर्जाच्या सापळयात अडकत चालला आहे.
10. भारतीय शेती अधिकांश प्रमाणात कोरडवाहू स्वरुपाची असुन त्यातुन मिळणारे उत्पादन व उत्पन्न अनिश्चित स्वरुपाचे आहे.
11. गेल्या काही वर्षात शेतकरी आत्महत्येत वेगाने वाढ होत आहे.
12. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती व आत्महत्या यांचा जवळचा संबंध आहे.
13. दुष्काळ व शेतकरी आत्महत्या यांचा जवळचा संबंध आहे.
14. शेतकरी आत्महत्येचा प्रश्न सर्वत्र सारखा नाही.

**शोषनिबंधाच्या अभ्यासाची उद्दीष्टये :–**



Scanned with OKEN Scanner

शेतकऱ्यांच्या आत्महत्या होण्याच्या कारणांचा अभ्यास करणे / शोध घेणे.
5. शेतकऱ्यांच्या आत्महत्या आकडेवारीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
6. शेतकरी आत्महत्या आकडेवारीचा तुलनात्मक अभ्यास करणे / शोध घेणे.
7. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे / शोध घेणे.
8. शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होण्यासाठीच्या उपाययोजना, साधनांचा अभ्यास करणे.

**अभ्यासाची संशोधन पध्दती :—**

ह्या संशोधनपर शोध निबंधासाठी मिळविलेली माहिती पुर्णपणे दुय्यम साधन सामग्रीवर आधारलेली असुन त्यासाठी विविध संदर्भग्रंथ, पुस्तके, विविध अहवाल, वार्षिकांक, मासिके, साप्ताहिके व देनंदिन वृत्तपत्रांमधुन सदरची सांख्यीकीय व विश्लेषणात्मक माहिती तसेच इतर आवश्यक आकडेवारी करुन, संदर्भ घेऊन सदरचा संशोधनपर शोध निबंध तयार करण्यात आला आहे.

लहान आकाराची/अकार्यक्षम धारण क्षेत्र—७५ टक्के आत्महत्या, २ ते १२.५ एकर जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांच्या आहेत, पाणिपुरवठ्याच्या पध्दती कमी, पाणीपुरवठ्याचे स्त्रोत कमी, भुधारणेचा आकार लहान शेतकऱ्यांमधील वाढता कर्जबाजारीपणा, कर्जाचा अनुत्पादक वापर, सावकारांकडून पिळवणूक आणि सावकारीचे वाढते प्रमाण, शेतमालाच्या किंमतीतील चढउतार/योग्य भाव न मिळणे, बियाणे, खते, किटक नाशकांच्या वाढत्या किंमती, चूकीचे सरकारचे धोरण — २०१३ मध्ये सोयाबीनचे भाव सर्वोच्च शिखरावर गेले असतांना शासनाने सोयातेल आयात केल्याने भावात घट झाली. कांदा आयात, साखर आयात, तेल आयात २०१६, २०१७ मध्ये ४६२७१० टन तुर आयात यामुळे भाव घट झाली.

दुष्काळ व शेतकरी आत्महत्त्येचा जवळचा संबंध आहे. तसेच कोरडवाहु शेती व आत्महत्त्यांचा ही जवळचा संबंध आहे. पुरुषांचे आत्महत्त्येचे प्रमाण जास्त असुन महिला शेतकऱ्यांचे आत्महत्त्येचे प्रमाण कमी आहे. हवामान बदल, नैसर्गिक आपत्ती, सरकारची चुकीची धोरणे, कमी उत्पादन, अस्थिर बाजारपेठ, कमी उत्पादकता, तोट्याची कृषी पध्दत, अयोग्य जमीन धारण क्षमता, बिगरकृषी क्षेत्रातील रोजगारीचा अभाव, देशांतर्गत कृषीची उत्पादकता ही असमान आहे. पंजाबचे प्रति हे. तांदुळ तो सध्या २ टक्के हून कमी आहे. जीडीपीतील ४० टक्के हिस्सा सध्या १३ टक्के आहे. म्हणून कृषी विकासासाठी योग्य व परिणामकारक सरकारी धोरणे अत्यावश्यक आहेत. म्हणून कृषी विकासासाठी योग्य व परिणामकारक सरकारी धोरणे अत्यावश्यक आहेत. सुधारीत बियाणे, संशोधक, सिंचनसुविधा, योग्य वित्तपुरवठा या सरकारी उपाययोजनांच्या बळावर हरीत क्रांती झाली. जागतीकीकरणानंतर सरकारचा अर्थव्यवस्थेमधील हस्तक्षेप कमी झाला. कृषी संकटाचे हे मुख्य कारण आहे. १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला ६७ टक्के असणार कृषीदर दशकाच्या शेवटी २९ हून खाली आला यामुळे कृषी क्षेत्राला पुन्हा सुगिचे दिवस आणण्यासाठी सरकारच्या सक्रीय हस्तक्षेपाला पर्याय नाही. शेतीपुरक व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांचे आत्महत्त्येचे प्रमाण कमी आहे. शासकीय मदती बरोबरच शासकीय आधाराने शेतकरी आत्महत्त्येचा प्रश्न सुचण्यास अधिक मदत होणार आहे.

**संदर्भ सुचि :—**

1) रसाळ, राजेंद्र अ. (२०१२)भारतीय अर्थव्यवस्था Pune:Success Publication, ( )
2) कोंडेवार — कोटलवार, स्मिता .(२०११)भारतीय अर्थव्यवस्था . लातुर :अरुणा प्रकाशन,
3) भोसले, काटे (२०१२)भारतीय अर्थव्यवस्था कोल्हापूर: फडके प्रकाशन,. पेज नं.१४५, १४६
4) चव्हाण, एन.एल, (२००९) भारतीय अर्थव्यवस्था.जळगांव: प्रशांत पब्लिकेशन



Scanned with OKEN Scanner

5) महाजन, दिलीप शेतकरी आत्महत्या (२०१८)*अर्थसंवाद एप्रील* – जुन मराठी अर्थशास्त्र परिषद – पेज नं.१३६, ५४–६०

6) दामजी, बी, एच (२००९) शेतकरी आत्महत्या. *अर्थसंवाद* जानेवारी–मार्च मराठी अर्थशास्त्र परिषद – पेज नं.३६७, ३७३

7) महाजन, दिलीप (२०१२)*Research Journey, International E Research Journal* –Nashik : Swatidhan Publication, Page No.273-279

8) बुलेटीन ऑफ युनिक अकॅडमी, (ऑगस्ट २०१७) पूणे: Unik Academy पेज नं. ५ ते १४

9) महाजन दिलीप (२०१२) शेतकरी आत्महत्या -आंतरराष्ट्रीय बहुभाषीक शोधपत्रिका – *प्रिंटींग एरिया* डिसे. २०१७ – व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगांव राजा पेज नं. १३२–१३५ बिड: हर्षवर्धन पब्लीकेशन (महाराष्ट्र)



Scanned with OKEN Scanner